पुरोगामी विचाराचे
एकमत

## सायबर जनजागृतीत राजर्षी शाहू महाविद्यालयाचा ठसा । क्विक हील फाऊंडेशन, पुणेचा उपक्रम

# ‘शाहू’ला ‘बेस्ट सायबर क्लब ओव्हरऑल’ पुरस्कार

**लातूर : प्रतिनिधी**



येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाला क्विक हील फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवॉर्ड्स २०२५-२६’ या कार्यक्रमात ‘बेस्ट सायबर क्लब ओव्हरऑल’ हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र सायबर पोलीस दलाचे डीआयजी संजय शिंत्रे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले. बी. एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) तृतीय वर्षातील जीत बुधोडकर याला ‘बेस्ट पीआर मीडिया डायरेक्टर’ हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच ओमकार सुर्यवंशी व अर्जुन चव्हाण या सायबर वॉरियर्सना ‘बेस्ट आऊटरीच टीम’ म्हणून गौरविण्यात आले.

या प्रसंगी क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती अनुपमा काटकर, कैलास काटकर, डॉ. संजय काटकर, अजय शिर्के, गायत्री केसकर व दिपू सिंग हे उपस्थित होते. सायबर सुरक्षा विषयक जनजागृती, विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरता वाढविणे आणि सुरक्षित इंटरनेट वापरासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला.

महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागातील बी. एस्सी. सी. एस. व बी. एस्सी. सी. ए. विद्यार्थ्यांच्या आरएसएमएल क्युएचएफ सायबर क्लब अंतर्गत विविध उपक्रम राबवून लातूर जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये तसेच समाजामध्ये सायबर सुरक्षेबाबत प्रभावी जनजागृती केली. प्रा. ज्योती माशाळकर, प्रा. जयश्री जटाळ, प्रा. श्रध्दा पवार यांनी विद्याथ्र्यांना या कार्यासाठी मार्गदर्शन केले. या उल्लेखनीय यशाबद्दल शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सचिव बी. बी. ठोंबरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, विभागप्रमुख प्रा. विश्वनाथ पांचाळ तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन कौतुक केले.